


*१) साधारण १९६०च्या सुमारास शिवाजी पार्क जिमखान्यात सुभाष गुप्तेबरोबर-मुळे वेस्ट इंडिजचा क्रिकेटर रोहन कन्हाय आला होता. त्यावेळी मला वाटतं बाळू नाईक हा सेक्रेटरी होता. बाळूने माझ्यासाठी रोहन कन्हायचा फोटो व स्वाक्षरी मला मिळवून दिली होती... २) टेस्ट क्रिकेटर रामनाथ केणी हा बॉबे स्कुल क्रिकेट कॅम्पचा एकेकाळी आम्हाला कोच होता. त्याची अलंकारिक व वळणदार अक्षरातील स्वाक्षरी इतरांपेक्षा वेगळी होती... हे माझ्या संग्रहातील.*

---

टीप: कृपया छायाचित्रांचा गैरवापर करू नये ही नम्र विनंती.

---

## व्यक्ती-वल्ली - 'स्वाक्षऱ्यांचा राजा' विजय उर्फ विजू देशपांडे




*विजूच्या सौजन्याने: १) माउंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली व्यक्ती, सर एडमंड हिलरी व विजू देशपांडे... २) जागतिक कीर्तीचे फुटबॉल पटू फ्रेड पेले व विजू... ३) गानकोकिळा लता मंगेशकर व विजू. बाजूला उषाताई...*

विजय उर्फ विजू देशपांडे हा माझा शिवाजी पार्कचा मित्र. पूर्वी जेथे शेटे यांचे हॉटेल होते त्याच्या बरोबर वरती तो रहात असे. १९५५ पासून विजूचा स्वाक्षऱ्या जमविण्याचा आगळा छंद होता. आणि त्याने ६५ वर्ष्यात हजारोंनी स्वाक्षऱ्या जमविविल्या होत्या. त्यामुळे त्याला 'Autograph King' म्हणत होते. त्याचं

वैशिष्ट्य असं होतं, प्रत्येक स्वाक्षरी घेतलेल्यांच्या बरोबर विजूचा फोटो असे. एअर इंडियात रिझर्वेशन विभागात ऑफिसर म्हणून तो मुंबई एअर पोर्टवर अनेक वर्ष काम करीत होता. कदाचित एअर इंडियात तो या उद्देशानेच लागला असावा असं गंमतीने म्हणणं वावगं ठरणार नाही. असो. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या देशी-विदेशी नामवंत प्रवाश्यांची त्याला आधीच खबर लागत असे. खिश्यात व ऑफिसमध्ये तो सदैव कॅमेरा ठेवीत असे. शिवाय, एयर इंडियाचे पंख व पोषाख असल्याने स्वारी International होती. ध्येय एकच, निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना गांठायचे व स्वाक्षरी घ्यायाची. हे निश्चित कौतुकास्पद होते. विजूला मी जेव्हा रस्त्यात पाहात असे तेव्हा तो तंद्रीत कांहीतरी गुणगुणत असे किंवा क्रिकेटच्या आठवणीत हातवारे करून गोलंदाजी करीत जात असे. विजूचा मोठा भाऊ नंदा हा मला सर जे. जे. स्कुल ऑफ आर्टला शिकवायला होता. तो उत्तम आर्टिस्ट होता. दिवाळीत दरवर्षी त्यांच्या घरी केलेला कंदील व रोषणाई हे एक शिवाजी पार्कचे आकर्षण होते. असो.





*१) मी, विजू देशपांडे व क्रिकेटर विलास गोडबोले... २) विजूच्या संग्रहातील माझ्या वडिलांची इंग्रजी व मराठी सही... व ३) वि स खांडेकरांची सही... खाली: १) मदर तेरेसा व विजू... २) क्रिकेटर विजय मर्चंट व विजू... ३) विजूच्या अनमोल स्वाक्षरी प्रदर्शनाचा आनंद घेतांना रसिक प्रेक्षक... विजूच्या सौजन्याने.*





२००१ मध्ये विजू सेवानिवृत्त झाला होता. परंतु, स्वाक्षऱ्या जमविण्याचं त्याचं वेड कांही कमी झालं नव्हतं. १९५५ साली एका क्रिकेटच्या सामन्यात सुप्रसिद्ध क्रिकेटर नरेंद्र ताम्हाणे, एम. एस. पाटील, वाय. बी. पटवा व विजय मांजरेकर या मान्यवर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्यांच्या संग्रहाने त्याची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. मग विजूने सभा, व्याख्यानमाला, परिषदे, नाट्य-चित्रपट पारितोषिक समारंभ, प्रदर्शने, नामवंतांच्या घरी जाणं, हॉटेल्स, विमानात, कामावर असतांना मित्रांमुळे व पत्राने अथक प्रयत्न करून त्यांनी स्वाक्षऱ्या मिळविल्या होत्या. या संग्रहात कला, नाट्य-चित्रपट, संगीत, क्रीडा, वाङ्मय, राजकारण, मंत्री, पंतप्रधान, राज्यपाल, राष्ट्राध्यक्ष, राजदूत, उद्योगपती, सेनाध्यक्ष, भारतरत्न, पद्म पुरस्कार विजेते, नोबल पारितोषिक विजेते, चाद्रवीर, गिर्यारोहक, चित्रकार, संशोधक, समाजसेवक व हॉललीवूड-बॉलिवूडचे कलाकार अशा अनेक क्षेत्रातील देश-विदेशी मान्यवरांच्या छायाचित्रांसह जवजवळ ३००० हून अधिक स्वाक्षऱ्या जमविल्या आणि एक विक्रम केला. यामुळे लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या १९९० च्या पहिल्या आवृत्तीत विजूची पहिला भारतीय स्वाक्षरी संग्राहक म्हणून नोंद झाली होती. हे अभिमानास्पद होते. तसेच, स्वाक्षरी संग्रहाची निरनिराळ्या देशात त्याची अनेक प्रदर्शने भरली होती. त्याचप्रमाणे, या क्षेत्रात ‘स्लाईड अँड टॉक शो’ चे देश-विदेशात ३५ हून अधिक प्रयोग करणारा विजूला पहिला भारतीय म्हणून मान-सन्मान मिळाला होता.



*माझ्या संग्रहात विजूने घातलेली दुर्मिळ भेट: १) नर्गिस, सुनील दत्त व विजू... २) शम्मी कपूर व विजू... ३) किशोर कुमार व विजू... खाली: १) दिलीप कुमार व विजू... २) अमजद खान, मेहमूद व विजू... ३) मेहमूद व विजू... विजूच्या सौजन्याने.*



हे सर्व आनंदाने एकहाती करीत असतांना विजूला कांही कटू अनुभवही आले होते. गोळवलकर गुरुजी, सी. डी. देशमुख, बालगंधर्व, अमर्त्य सेन व क्रिकेटर रिची बेनॉ यांनी त्याला स्वाक्षरी देण्याचे नाकारले होते. तसेच होमी भाभा, सर फ्रँक वॉरेल व प्रिन्स चार्ल्स यांच्या स्वाक्षऱ्या थोडक्यात हुकल्या होत्या. शिवाय, एक कटू आठवण म्हणजे विजूची ६०-७० स्वाक्षऱ्यांची वही हरवली होती..! या संग्रहाच्या वेडापायी एअर इंडियात नोकरी मिळालेल्या विजूला लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्मध्ये जेव्हा नोंद झाली होती त्याची प्रत भारतरत्न लता मंगेशकर यांच्या हस्ते मिळाली होती. स्वा. सावरकरांची गहाळ झालेली स्वाक्षरी अचानक रस्त्याच्या कडेला पाण्याच्या ओघळात सांपडली होती. अनेकांच्या स्वाक्षऱ्या पत्ररूपाने मिळाल्या होत्या. नेपाळचे राजे महिंद्र व राणी रत्ना यांच्या स्वाक्षऱ्या चार तासांच्या प्रतीक्षेनंतर मिळाल्या होत्या, तर एकाच दिवशी सिडनी क्रिकेट मैदानात ४०हून अधिक आंतराष्ट्रीय क्रिकेट वीरांच्या स्वाक्षऱ्या मिळाल्या होत्या. परंतु, दुबईत नेल्सन मांडेला व श्रीलंकेत जयवर्धने यांच्या स्वाक्षऱ्या जमवितांना विजूचा तुरुंगवास टळला होता..! असेही भयावह अनुभव त्याला आले होते. असो. नेताजी सुभाषचंद्र बोस, फुटबॉल किंग पेले, मदर तेरेसा, जे. आर. डी. टाटा, राजेंद्रप्रसाद, सर डॉन ब्रॅडमन, सर गारफिल्ड सोबर्स, रॉड लेव्हर, बियॉन बोर्ग, बिल गेट्स, बिल क्लिंटन, शेर्पा तेनसिंग, उस्ताद बडे गुलाम अली खान व बिस्मिल्ला खान, माझे वडील वि. ह. कुळकर्णी, वि. स. खांडेकर व वि. वा. शिरवाडकर इत्यादिंच्यासह अनेक मौलिक स्वाक्षऱ्यांची संग्रहात भर पडत गेली ती थांबलीच नव्हती...

मंडळी, कांही महिन्यापूर्वी विजू हृदय विकाराने गेल्याची दुःखद बातमी

कानावर आली आणि मनस्वी वाईट वाटलं होतं. कांही वर्ष्यांपूर्वीच मी हा लेख लिहून ठेवला होता. आज प्रथम तो आपल्या समोर सादर करीत आहे. विजूने मला त्याच्याकडील सिनेकलाकरांचे अनेक दुर्मिळ फोटो देऊन माझ्या संग्रहात भर घातली होती. हा त्याचा साक्षेप व औदार्य मी कदापि विसरू शंकणार नाही. तसेच, मीही त्याला माझ्याकडील कांही दुर्मिळ स्वाक्षऱ्या भेट दिल्या होत्या. विजू हा खऱ्या अर्थाने 'स्वाक्षऱ्यांचा राजा' होता. यात वाद नव्हता. त्या क्षेत्रात त्याने यशस्वी राज्य केलं होतं. दुर्दैवाने या इतिहासाला आता पूर्णविराम मिळाला आहे. मात्र, विजूच्या आठवणी स्वाक्षऱ्यांसह कायमच्या स्मरणात राहाणाऱ आहेत. या माझ्या मित्राला साश्रू नयनांनी ही माझी आदरांजली व मानाचा मुजरा होय..!
जयंत.

ता. क. सांगायला अभिमान वाटतो की, विजूने 'स्वाक्षरांकित' नांवाचं उत्कृष्ट ई-बुक प्रकाशित केलं आहे. ते येथे पाहावं:
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/swaksharankit_vijay_deshpande.pdf

---